रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

धनगर समाजाच्या उपोषणाला राज्य सरकारच्या शिष्टमंडळाची भेट

## मुंबई मंत्रालयात तातडीने बैठक आयोजित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे दूरध्वनीवरुन आश्वासन



**जालना । प्रतिनिधी -** धनगर समाजाला एसटीचे आरक्षणाची मागणीसाठी जालना येथे आमरण उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे यांनी आपले उपोषण मागे घ्यावे यासाठी त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ म्हणुन पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे आणि जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांनी भेट घेवून त्यांच्या प्रकृतीबाबत विचारणा करुन उपोषण मागे घेण्याबाबत विनंती केली.

यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल यांची उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, मी याठिकाणी पालकमंत्री म्हणून आले आहे. दिपक बोऱ्हाडे यांची मागील तीन दिवसांपासून तब्येत खालावली असुन, त्यांनी धनगर समाजासाठी केलेल्या मागण्यांविषयी आमच्या मनात संवेदना आहेत. धनगर समाज या मागण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून लढा देत आहे. त्यामुळे शासन देखील तुमच्या मागण्याबाबत सकारात्मक असुन, तुमच्या न्यायासाठी लढणार आहे. परंतू हा प्रश्न चर्चेतून सोडता येईल याकरीता दिपक बोऱ्हाडे यांनी आपले उपोषण सोडून, आपले शिष्टमंडळ घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत चर्चा करण्यासाठी मुंबईला यावे असेही पालकमंत्री पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीष महाजन म्हणाले की, धनगर समाजाचा एसटी आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. सद्या हा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत असून, हा प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी बैठका होत आहेत. यासाठी थोडा वेळ लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. आपण आरक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहात, यात शंका नाही. शासनाला देखील वाटते की हा प्रश्न आता सुटला पाहिजे परंतू काही कायद्याच्या अडचणी असल्याने याची आपणा सर्वांना कल्पना आहे. परंतू श्री. दिपक बोऱ्हाडे हे मागील ११ दिवसापासून उपोषण करत असून इतके दिवस उपोषण करणे योग्य नाही, त्याकरीता त्यांनी आपले उपोषण सोडावे. समाजाचा प्रश्न महत्वाचा असून हा प्रश्न सोडविण्यासाठी चर्चेची आवश्यता आहे. याकरीता श्री. बोऱ्हाडे यांनी चर्चेसाठी मुंबईला यावे आपण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासोबत बसून यावर चर्चा करु असे सांगितले.

यावेळी श्री. बोऱ्हाडे यांच्या प्राथमिक चर्चा झाल्यानंतर मंत्री पंकजा मुंडे आणि गिरीष महाजन यांनी श्री. बोऱ्हाडे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून बोलणे करून दिले. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी श्री. बोऱ्हाडे यांना शासन धनगर समाजाला आरक्षण देण्याकरीता सकारात्मक आहे. त्यासाठी प्रयत्न देखील करत आहे. परंतू एससी एसटी आरक्षण हे संवैधानिक आरक्षण असुन हा केंद्राचा विषय आहे. शासनाने आरक्षणाबाबत आपली बाजू मांडली आहे. परंतू सर्वोच्च न्यायालयामुळेही यामध्ये काही अडचणी निमर्‍ाण झाल्याचे सांगुन, धनगर समजला एसटीतून आरक्षण देण्यासाठीची कायदेशीर प्रक्रिया सांगितली. तसेच हा प्रश्न सोडविण्यासाठी जो पर्यंत चर्चा होणार नाही, तोपर्यंत मार्ग् निघणार नाही. याकरीता श्री. बोऱ्हाडे यांनी आपले उपोषण सोडून चर्चा करण्यासाठी मुंबईला येण्याचे निमंत्रण दिले.

यानंतर बोऱ्हाडे यांनी उपोषण मागे घेण्याबाबत कोणताही निर्णय जाहीर केलेला नाही. मात्र, मुख्यमंत्र्यांचे पान ३ वर

## खानापूर वरखेडा फिरंगी ग्रामपंचायतचा अभ्यास दौरा



**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी -** खानापूर वरखेडा फिरंगी ता.जाफराबाद. ग्राम पंचायतच्या वतीने आदर्श गाव पाटोदा या ठिकाणी अभ्यास दौरा करण्यात आला यावेळी आदर्श गाव पाटोदा चे सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी उपस्थित असलेल्या सर्व महिलांना त्यांनी राबविलेल्या योजनांची माहिती दिली. या दौऱ्यामध्ये सहभागी असणाऱ्या महिलांनी पाटोदा गावातील सांडपाणी व्यवस्थापन,कचरा व्यवस्थापन ,पक्के रस्ते रस्त्याच्या दोन्ही कडेने पेव्हर ब्लॉक आणि गावातील हिरवळ, वृक्ष लागवड या बाबींची माहिती घेतली. यावेळी ग्रामपंचायत खानापूर/वरखेडा फिरंगी येथील सरपंच शेषराव जाधव, उपसरपंच ज्ञानेश्वर शेळके,सदस्य दिपाली ऋषिंद्र शेळके, वंदना पंढरी तायडे, गयाबाई रामचंद्र गोरे, मंगल निवृत्ती जाधव, रेखा ज्ञानेश्वर शेळके, यशोदा संतोष जाधव यांच्यासह गावातील महिला शारदा प्रदीप शेळके, विद्या दत्तू शेळके, छाया शंकर शिंदे, लक्ष्मी गुलाबराव शेळके, लक्ष्मी बालाजी शेळके ,अरुणा सुनील शेळके, शकुंतला एकनाथ शेळके, नंदा मधुकर शेळके, सुमन बबन बर्डे ,उषा विलास शेळके, लता बळीराम शेळके, लीला किसन शेळके, मंदाबाई सुभाष मोरे, सविता जाधव, गीता गोरे, तुळसा तिडके, रुखमन वाघमारे, आशा बोर्डे,कल्याणी तायडे, नीता हिवरे यांच्यासह सर्व कर्मचारी वर्ग आशाताई, अंगणवाडी ताई मदतनीस ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

युवा आदर्श

### प्रांजळ ...

झाल्या केल्या चुका
कबुली द्यावी प्रांजळ
मनोमन वहावी कधी
क्षमा पुष्पांची ओंजळ
अनेक घडले अपराध
चोरुन अथवा उजळ
मोकळे करता मनांस
कमी होईल जळजळ
सुस्पष्ट दिसे काळोख
डोळ्यां घाले काजळ
कधी ना लागावी दृष्ट
प्रतिमा ठेवा सोज्वळ
बोलावे मनात दडले
चरित्र करायचे निर्मळ
चिखलात राहून सुध्दा
जसे फुलारते कमळ
किती भुलावण दिसो
होऊ नकात उतावळ
मान्य करावे प्रमादास
मुळीचं नसे कुणावळ
चाला खडतर वाटेवर
मागे पसरावी हिरवळ
दिमाखदार ते प्रस्थान
रहावा स्मृतीत दरवळ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## एक पेड मा के नाम हे अभियान बूथ स्तरापर्यंत राबवून वृक्ष लागवड करा - भास्कर दानवे


**जालना । प्रतिनिधी -** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्त सेवा पंधरवाडा अभियान अंतर्गत एक पेड मा के नाम हे अभियान जिल्हा स्तरापासून ते बूथ स्तरापर्यंत यशस्वीपणे राबवून वृक्षरोपण करा असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे (दि.२६ सप्टेंबर) आयोजित कार्यक्रमात कार्यकर्त्यांना केले.

यावेळी माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, माजी महानगर जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर, सतीश जाधव, युवा नेते अक्षय भैया गोरंटयाल, माजी सरचिटणीस देविदास देशमुख, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.शुभांगीताई देशपांडे, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षा सौ. संध्याताई देठे, सरचिटणीस अरुणाताई जाधव, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, धनराज काबलिये, प्रा.राजेंद्र भोसले मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, अमोल धानुरे, संजय डोंगरे, नगरसेवक शशिकांत घुगे, रमेश गौरक्षक, पान ३ वर




## गोषेगांवच्या विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर तायक्वादो स्पर्धेत निवड

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गोषेगांव ता. भोकरदन जि.जालना येथील मुजैफ मुक्रम शेख याने जालना येथे क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय तायक्वादो स्पर्धेत १९ वयोगट मध्ये ६२ ज्ञस वजन गटात खेळून जिल्हास्तरीय स्पर्धेत विजयी होऊन विभागीय स्तरावर निवड झाली. या बद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनील वाकेकर साहेब व संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर यांनी मनपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या.या विद्यार्थ्यास क्रिडा शिक्षक श्री. गोविंद शिंदे .,श्री.नंदकिशोर मापारी यानी मार्गदर्शन केले. या प्रसंगी क्रीडा अधिकारी जालना, भोकरदन समनव्ययक , केंद्रप्रमुख सोनवणे सर , यांच्यासह सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचार्यानी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांनी अध्यापन कौशल्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन ज्ञान व पद्धती आत्मसात कराव्यात - आ. बबनराव लोणीकर

सेवा पंधरवडा निमित्त परतुर मंठा शिक्षण विभागाच्यावतीने वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणार्थी प्रमाणपत्र वाटप

**परतूर । प्रतिनिधी -** शिक्षक प्रशिक्षणाचे महत्व शैक्षणिक उत्कृष्टतेचा आधारस्तंभ म्हणून ओळखले जाते. हे शिक्षकांना त्यांच्या अध्यापन कौशल्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि नवीन ज्ञान व पद्धती आत्मसात करण्यासाठी सतत मदत करते. प्रशिक्षित शिक्षक प्रभावी अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या परिणामांमध्ये सुधारणा होते. शिक्षण क्षेत्रात सतत नवनवीन संशोधन आणि तंत्रज्ञान येत असते. प्रशिक्षणामुळे शिक्षकांना नवीन शैक्षणिक ट्रेंड, तंत्रज्ञान आणि अभ्यासक्रमातील बदल यांची माहिती मिळते. प्रशिक्षणाद्वारे शिक्षक वर्ग व्यवस्थापनाची कौशल्ये शिकतात. यामुळे वर्गात सकारात्मक वातावरण निर्माण होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासात टिकून राहते. या सर्व बाबींच्या अनुषंगाने देखील शिक्षकांनी प्रयत्न करावेत असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

योगानंद विद्यालयात आयोजित सेवा पंधरवाडा कार्यक्रमानिमित्त आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी वरिष्ठ वेतन शणी व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी शिक्षकांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी मनोहर पेडगावकर, परेश पाटील, भगवानराव मोरे, संपत टकले, पद्माकर कवडे, संतोष दायमा, ड चंद्रकांत पाटील ड लिंबुळकर प्रभाकर डोल्हारकर अशोक उबाळे गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके, गोविंद चव्हाण, मुख्याध्यापक हरिभाऊ मोगल, यांची प्रमुख उपस्थिती होतीया. वेळी पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की सेवा पंधरवडा हा मुख्यत्वे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त (१७ सप्टेंबर) सुरू होणारी आणि महात्मा गांधींच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) चालणारी एक विशेष मोहीम आहे, ज्यामध्ये विविध सेवा आणि कल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शिक्षण विभागाच्या वतीने वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी प्राप्त प्रशिक्षणार्थी शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र तसेच गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा गुणगौरव कार्यक्रम या निमित्ताने परतुर व मंठा तालुक्यातील शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या काळात विविध शासकीय विभाग (उदा. महसूल विभाग) त्यांच्या सेवा अधिक पारदर्शक आणि वेगवान करण्यासाठी विशेष मोहीम पान ३ वर



संपादकीय

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग

पाकिस्तान मधील पंजाब प्रांतातील बांगा गावांमध्ये २८ सप्टेंबर १९०७ ला भगतसिंग नावाचा क्रांतिकारक तेजस्वी तारा जन्माला आला आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश निर्माण झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात प्रज्वलित झाली आणि वयाच्या १४ व्या वर्षी स्वतंत्र लढ्यात उडी घेतली.भगतसिंग यांच्या आई-वडीलांनी भगतसिंग यांचे लग्न १९ व्या वर्षी करण्याचा विचार केला.परंतु त्यांनी लग्नास नकार दिला व घर सोडून निघून गेले आणि आपल्या आई-वडिलांकरीता एक पत्र लिहिले या पत्रात भगतसिंग लिहितात मेरा जीवन एक महान उद्देश के लिये समर्पित है और वह उद्देश देश की आजादी है इसलीये मुझे तबतक चैन नही है.ना ही मेरी ऐसी कोई सांसारिक सुख की इच्छा है. यावरून स्पष्ट झाले की त्यांच्या नसानसात स्वातंत्र्याची ज्वाला धकधकत होती. ८ एप्रिल १९२९ ला भगतसिंग यांनी आपले क्रांतीकारी मित्र बटुकेश्वर दत्त यांच्या सोबत दिल्लीतील सेंट्रल असेम्ब्लीवर बाँब टाकला व इंग्रजांना जबरदस्त धक्का दिला यामुळे संपूर्ण भारतात स्वातंत्र लढ्याचा आगास झाला. आज शहिदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलीदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली. १९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी



पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली.त्यामुळे जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला. हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पहावले नाही.त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले.संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही. जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोण्हीही विसरणार नाही. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.यामुळेच देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. यामुळे महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां व,गरीबी व सर्वसामान्यांचे हाल-बेहाल होतांना दिसते.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशवासीयांच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी. परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्यान व स्वत: कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर ९५ टक्के राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन करोडपती झाल्याचे दिसून येतात. भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांनी फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य आणि चांगला उपयोग करून जनसेवा केली पाहिजे.तेंव्हाच शहिद-ए-आजम भगतसिंग यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.त्यामुळे सावधान!राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी-कोटी प्रणाम शहिद भगतसिंग यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे. मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी, सरकार, प्रशासन व सामाजिक संस्था यांनी भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे.यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व झाडांच्या पानांत,फुलात, फळात आपल्याला शहिद भगतसिंग सह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल.जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा शहिद भगतसिंग यांना कोटी-कोटी प्रणाम. जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.**

# माणसा नको होऊ कावराबावरा मनाला आवरा

आजकाल माणूस तापट, चिडचिडा, असंयमी, सर्किट आणि अतिशय गरम दिमाखाचा व रागीट स्वभावाचा बनला आहे. त्याला अपयशामुळे, दुःखामुळे, आर्थिक टंचाईमुळे, वाढत्या सावकारी कर्जामुळे आणि घरातील आजारी पडलेल्या व्यक्तींमुळे हल्ली माणसाला प्रचंड राग व संताप येत आहे आणि या आलेल्या संतापातून व रागातून मनावर जराही संयम नसल्यामुळे व मनावर कोणताच ताबा नसल्यामुळे माणूस नको ते टोकाचे पाऊल उचलत आहे आणि स्वतःची जीवन यात्रा संपवत आहे. कारण आजकाल माणसाला स्वतःच्या मनाला आवर घालणे व मन ताब्यात ठेवणे जमेनासे झाले आहे. माणसाचे मन मोकाट जनावराप्रमाणे झाले आहे. त्या मनामध्ये जराही शांतता, कंट्रोल, धीर व संयमीपणा नसल्यामुळे माणूस नको ते कृत्य करत आहे, याच कारणामुळे भांडण तंटे, आत्महत्या, एकमेकांचा खून करणे, एकमेकांना मनसोक्त मारणे आणि स्वतःचे बरे वाईट करून घेणे हे प्रकार रागाच्या व संतापाच्या भरातून होत आहेत. माणसाचे मनच फार विचित्र झाले आहे. रानटी पशु प्रमाणे आणि उधळणाऱ्या उथळ जनावराप्रमाणे वागत आहे. म्हणून म्हणतो माणसा हो जरा कावर आणि मनाला जरा आवर. अगदी शुल्लक गोष्टीवरून वाद-विवाद होत आहेत. वडिलांनी मोबाईल घेऊन दिला नाही म्हणून मुले आत्महत्या करत आहेत. स्पर्धा परीक्षेत एक दोन गुणांनी अपयशाला सामोरे जावे लागले म्हणून मुले जीवन संपवत आहेत. वेळेवर लग्न जुळत नाही आणि मनाप्रमाणे मुलगी मिळत नाही म्हणून आत्महत्या होत आहेत. याचा अर्थ असा की, माणसांमध्ये संयमच राहिला नाही आणि माणूस अधीर, तापट व चिडक्या स्वभावाचा झाला आहे. रागाच्या माध्यमातून अपमान तयार होतो आणि ह्या अपमानातून माणूस मनाने खचतो आणि खचलेला माणूस स्वतःचे जीवन एका क्षणात उद्ध्वस्त करून टाकतो. माणसाचे मन माणसाला ओळखायला तयार नाही, सख्या भावंडांमध्ये असणारी प्रेमाची व मायेची नाळ कमकुवत झाली आहे. आणि मनाच्या तारा जळून खाक झाल्या आहेत. माणसाने मन जेवढे ताब्यात व आपल्या मुठीत ठेवले तेवढे आपल्यासाठी जीवाला बरे होईल. गाडी चालवताना, मोटार सायकल चालवताना माणूस जेवढा मन एकाग्रतेने व ताब्यात ठेवून गाड्या चालवतो तेव्हा गाड्यांचे अपघात कधीच होत नाहीत. हा सगळा मनाचा खेळ आहे. परंतु माणसाच्या मनात जर वेगळेच विचार घोंगावत असतील आणि माणूस गाडी चालवत असेल तर समोर होणारे अपघात हे अटळ असतील. याला कारणीभूत माणूस नसून माणसाचे मन आहे म्हणून माणसाने माणसाचे मन कंट्रोलमध्ये ठेवणे काळाची गरज आहे. या जगात जेवढ्या काही गोष्टी घडत आहेत, मग त्या पती-पत्नीच्या, सख्ख्या भावांच्या आणि रक्ताच्या नात्यातील किंवा सोयरपणातील कोणत्या ना कोणत्या कारणाने जसे की, पैशाच्या वादावरून किंवा वैयक्तिक व कौटुंबिक कारणामुळे वाद होण्याला कारणीभूत माणसाचे मन आहे कारण आजकाल माणसाच्या मनामध्ये एकमेकांबद्दल विश्वास राहिला नाही, जरासा ही विश्वासघात केला, मनाविरुद्ध वागले किंवा जुजबी शिवीगाळ केली की, माणसाच्या नात्यातील मनामनात बांधलेल्या नात्याच्या तारा तटातट तुटतात आणि यातूनच घरगुती भांडण तंटे होतात आणि हे भांडण तंटे रस्त्यावर येऊन आणखीन जोराने भांडणाचे स्वरूप वाढते. कारण लोक बघत असतात आणि लोक बघू लागले की, भांडण करणाऱ्यांच्या वादामध्ये आणखीन वाढ होते आणि हे वादविवाद विकोपाला जाऊन कोर्ट कचेरी, पोलीस स्टेशन यांच्या वाऱ्या कराव्या लागतात. प्रसंगी तुरुंगवास भोगाव लागतो. त्यासाठी मित्रांनो, मनाला नेहमी आनंदी ठेवा...मनाला आपल्या ताब्यात व कंट्रोलमध्ये ठेवा... आपण मनाचे गुलाम होण्यापेक्षा मनाला आपला गुलाम बनवा आणि मन आपल्याला सांगेल तसे जीवन जगण्यापेक्षा आपण मनाला सांगाल तसे जीवन जगा... चांगल्या व दर्जेदार लेखकांची पुस्तके वाचा...टीव्हीच्या व मोबाईलच्या माध्यमातून मनोरंजनात्मक व विरंगुळात्मक व्हिडिओ पहा...रिकामे डोके सैतानाचे घर, असे म्हटले जाते ते अगदी खरे आहे. मनाला कधीच रिकामे ठेवू नका.... कोणत्या ना कोणत्या कामात त्याला बंदिस्त करून ठेवा... ज्या दिवशी तुम्ही तुमच्या मनाला मोकाट सोडाल त्या दिवशी तुमचे मन तुम्हाला विनाशाच्या खाईत लोटल्याशिवाय राहणार नाही....आणि मन ताब्यात व कंट्रोलमध्ये ठेवून संयमाने व हिंमतीने जीवन जगाल तर नक्कीच तुमच्या जीवनात घडणारे अनुचित प्रकार टळतील. म्हणूनच मद्दाम म्हणतो माणसा हो कावर आणि मनाला आवर....



**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दोन दिवसीय 'लिंगभाव संवेदीकरण कार्यशाळा' संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीतर्फे शुक्रवार दिनांक २६ आणि शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित दोन दिवसीय 'लिंगभाव संवेदीकरण कार्यशाळा' यशस्वीरित्या संपन्न झाली. कार्यशाळेचा मुख्य उद्देश हा विद्यापीठातील विविध स्तरांवरील अधिकारी - कर्मचाऱ्यांमध्ये लिंगभाव समानतेविषयी जाणीव-जागृती निर्माण करणे, कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ (पॉश कायदा) बद्दल सविस्तर माहिती देणे व कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी सुसंवादी - निकोप वातावरण निर्मिती करणे हा होता. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यशाळेत पुणे विद्यापीठाच्या स्त्री आणि लिंगभाव शिक्षणशास्त्र विभागाच्या चार सदस्यीय चमूने विषय व सत्रनिहाय मार्गदर्शन केले.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले तर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ संचालिका डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या सदस्या श्रीमती हेमलता पटवर्धन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्त्री आणि लिंगभाव शिक्षणशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. स्वाती द्याहाडराव, डॉ. स्नेहा गोळे, डॉ. ललित भवरे व प्रा. दीपा टाक, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समितीच्या पीठासन अधिकारी डॉ. माधुरी सोनवणे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत होती.

आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी स्त्री - पुरुष यांच्यात समानता निर्माण व्हावी यासाठी कुटुंब ही सर्वात महत्वाची शाळा आहे. प्रत्येक मातेने लहानपणापासून आपल्या मुलांमध्ये सर्वांप्रती समान वागणुकीची भावना निर्माण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादित केले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन यांनी आपल्या कार्यशाळा समारोपाच्या भाषणात स्त्री - पुरुष असा भेद न ठेवता सर्वांप्रती समान भावना ठेवण्यासाठी प्रत्यक्षात सकारात्मक कृतीची गरज व्यक्त केली. पूर्वापार भारतीय संस्कृती व समाजात स्त्रीला पुरुषापेक्षा उच्च स्थान देण्यात आल्याचे त्यांनी उदाहरणांसह सांगितले. विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या सदस्या श्रीमती हेमलता पटवर्धन यांनी भारतीय समाजात अधिकार सर्वांना कळतात पण जबाबदारीची जाणीव त्याप्रमाणात नसते अशी खंत व्यक्त केली.



कार्यशाळेत लिंगभाव समानतेचे महत्त्व, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) कायदा २०१३ (पॉश कायदा) : एक ओळख, लिंगभाव समानता आस्थापनेमध्ये व्यवहारात आणावयाची कशी?, विशाखा कायदा, राजस्थानातील भंवरीदेवी न्यायालयीन प्रकरण याविषयीची माहिती देण्यात आली. तसेच व्याख्यान, चर्चासत्र, प्रश्नोत्तरे, प्रत्यक्ष कृती व विविध खेळातून प्रबोधन करण्यात आले. समारोप प्रसंगी सहभागी सदस्य श्री. भाऊसाहेब डांगे, श्रीमती दिपाली तायडे, हृषीकेश पवार, प्रा. राजकुमार ननावरे यांनी कार्यशाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. समिती सदस्य श्री. राजेंद्र वाघ यांनी मान्यवरांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन समिती सदस्य सौ. संगीता देशपांडे व डॉ. भागवत चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन डॉ. माधुरी सोनवणे यांनी केले. कार्यशाळेसाठी विद्यापीठातील सर्व विद्याशाखा संचालक, प्राध्यापक, अधिकारी - कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कर्मचारी आणि शेतमजूर उपस्थित होते.

इंडियाना-द कल्चरल बिझ कार्यक्रमाचा शुभारंभ

# विकसित भारत अभियान अंतर्गत इंडियाना एक सक्षम उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी -** विकसित भारत अभियान २०४७ यांच्या अंतर्गत साई बिज़नेस क्लब तर्फे इंडियाना-द कल्चरल बिझ या अनोख्या कार्यक्रमाचा शुभारंभ शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी पुण्यातील सेनापती बापट रोड, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरच्या सभागृहात झाली. साई बिझनेस क्लबच्या संचालिका आणि इंडियाना उपक्रमाच्या मुख्य आयोजिका प्रो. डॉ. कृती वजीर यांनी उपक्रमाची माहिति दिली. यावेळी डॉ. जिदापा थावरीत, ड नीरा धाडगे, नीलेश पैठणकर, प्रज्ञा अत्रे, स्वाती नाटेकर, सन्मय पाटील, प्रशांत वाडेकर, रितू आगवकर, चैताली पारेक, वर्णिका भार्गव, शिवतेज शिंदे, अश्विनी यटिंगुड्डा, राधिका कौठा आदी मान्यवर उपस्थित होते.

इंडियाना-द कल्चरल बिझ हे व्यासपीठ भारतातील अव्वल ब्रँड्स (मालमत्ता, भागीदारी आणि कंपन्या) यांना एकाच सांस्कृतिक छताखाली आणणारी एक नाविन्यपूर्ण संकल्पना आहे. या अनोख्या उपक्रमात भारतीय कला प्रकार, वारसा आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती - जसे की नृत्य, संगीत, नाटक, हस्तकला आणि कथाकथन - यांचा वापर ब्रँड्सना सर्जनशील आणि प्रामाणिकपणे प्रोत्साहन देण्यासाठी केला जातो. इंडियाना द्वारे साई बिझनेस क्लब हे केवळ नेटवर्किंग नसून ते सांस्कृतिकदृष्ट्या मजबूत आणि आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली भारत निर्माण करण्याची एक चळवळ आहे. असे मत प्रो. डॉ. कृती वजीर यांनी व्यक्त केले.



विकसित भारत अभियान अंतर्गत इंडियाना भारताच्या समग्र विकासाच्या दृष्टिकोनासाठी एक उत्प्रेरक साधन म्हणून ओळख करत असून भारतीय ब्रँड संस्कृती-केंद्रित ब्रँडिंग आणि प्रचार मोहिमांद्वारे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःचा प्रचार करू शकतात. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय बनकर, श्रावणी चव्हाण आणि अंश द्विवेदी यांनी केले होते.

# आधार ग्रुपच्या वतीने आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**जालना । प्रतिनिधी -** काही दिवसापासून जालना शहर व परिसरात होत असलेल्या अतिवृष्टीने जालना शहरातील झोपडपट्टी भागातील नागरिकांसह अनेक शाळकरी विद्यार्थ्यांचेही पाठ्यपुस्तके व शालेय साहित्य खराब झाल्याने मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे.

आधार ग्रुपचे अध्यक्ष अश्विन अंबेकर यांनी ही बाब लक्षात घेत आज शुक्रवार रोजी आधार ग्रुपचे सदस्य कुणाल देशमुख, अभिमन्यू काठोठीवाले, संदीप मगर, आकाश बारगजे, चेतन गुप्ता, गौरव इंगळे, गणेश डोके यांना सोबत घेऊन जालना शहरातील साठे नगर व परिसरातील गोरगरीबांच्या या वस्तीत वह्या व पेन या शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. आधार ग्रुप हा नेहमीच वेगवेगळ्या अडचणीच्या प्रसंगी सामान्य व अडचणीत असलेल्या नागरिकांना मदत करत असतो. यापूर्वीही आधार ग्रुपच्या वतीने अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना अन्नधान्याच्या किट वाटून आपत्तीग्रस्तांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला. आधार ग्रुपच्या वतीने विद्यार्थ्यांना करण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याच्या मदतीबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

# माहोरा येथील रेणूका माता मंदिर परिसरात यात्रेचे स्वरूप



**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील माहोरा येथे रेणुका देवी संस्थान च्या वतीने मंदीर परिसरा मध्ये लायटिंग आणि पताका लाऊन रोषणाई करण्यात आली आहे. मराठवाडा विभागातील ग्रामीण परिसरातील भाविकांचे शक्तीपीठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या येथील रेणुका मातेच्या मंदिरात २२ सप्टेंबर पासून नवरात्रोत्सवास घटस्थापनेने सुरुवात झाली. नवरात्र उत्सव विजयादशमी पर्यंत चालतो. यामध्ये दररोज सकाळी काकड आरती त्यानंतर ७.३० वाजता आरती होते तसेच परत सायंकाळी ८ वाजता आरती घेतली जाते.असे नित्यनेमाने दररोज आरती घेतली जाते. आरती साठी माहोरा आणि माहोरा परिसरातील भाविक खूप मोठ्या संख्येने हजर असतात. भाविकांची सकाळ पासून ते संध्याकाळ पर्यंत खूप मोठी गर्दी असते.तसेच रात्री दररोज भजनी मंडळे भजन घेतात.

धनगर समाजाच्या आमरण उपोषणाला मंत्री उदय सामंत यांची भेट

# मागण्यांबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार - मंत्री सामंत



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील धनगर समाजाच्या आमरण उपोषणाला मंत्री उदय सामंत यांनी भेट दिलीय. यावेळी त्यांनी उपोषणकर्ते दीपक बोराडे यांच्या तब्येतीची विचारपूस केलीय. धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी दीपक बोराडे यांनी जालन्यात आमरण उपोषण सुरू केलंय. त्यांच्या उपोषणाचा आज दहावा दिवस आहे. आज राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत जालना दौऱ्यावर आले असता त्यांनी बोराडे यांच्या उपोषणाला भेट देत बोराडे यांच्या तब्येतीची विचारपूस केली. दीपक बोराडे यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसह चर्चा करणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी सामंत यांनी माध्यमांशी बोलतांना दिलीय. यावेळी त्यांच्यासह आमदार अर्जुन खोतकर युवा नेते अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, शेख नजीर हे देखील उपस्थित होते.

# पाथ्रुडच्या नदीवरील पुल फुटला



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील उमरी गावाला जाडणर्या रस्त्यावरील पाथ्रुड गावच्या लगत असलेल्या नदीवरील जुना पुल गेली दोन वर्षा पासून फुटलेल्या आहे .

रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे पाणी पुलावरून गेले पुल पुर्ण पणे फुटला आहे , उमरी गावला जोडणारा पाथ्रुडवरून एकमेव रस्ता आहे. या पुलावरू जिवमुठीत घेऊन शाळेतील मुल व गावकरी प्रवास करत आहे . या नदीला येणारे पाणी हे प्रचंड आहे. त्या पुलाच्या कामाला पंधरा वर्षे पूर्ण झाली. आता नव्या पुलाची गरज येथे आहे . तरी शासनाने युद्ध पातळीवर या पुलाचे काम करावे, अशी मागणी धर्मवीर छावा संघटनेचे जालना जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण गाडेकर व जालना तालुका अध्यक्ष शिवव्याख्याते कृष्णा गाडेकर यांनी केली .

# हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनतर्फे शिक्षण उपनिरीक्षक भारत पालवे यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर -** विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनने नवनियुक्त शिक्षण उपनिरीक्षक भारत पालवे यांचा सत्कार आयोजित केला. भारत पालवे साहेब यांची नियुक्ती शिक्षण उपनिरीक्षक पदी करण्यात आली आहे.हा सत्कार स्नेहपूर्ण व आदरपूर्वक ठेवण्यात आला.हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी सत्काराचे प्रमुख हस्तीक्षेप केले. पारंपरिक पुष्पगुच्छाच्या ऐवजी उपक्रमात पुस्तक, पेन आणि शाल देऊन आदर व्यक्त केला गेला. शेख अब्दुल रहीम सरांनी भारत पालवे साहेब यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानासाठी अभिनंदन केले. हा सत्कार आदरपूर्वक, आपुलकीने आणि कर्तुत्वाबाबतचा सन्मान म्हणून साजरा केला गेला. भारत पालवे साहेब हे मार्गदर्शक, मित्र आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनसारख्या सामाजिक संस्थेकडून सकारात्मक प्रेरणा व सन्मानाची परंपरा जालन्यात राबवली जात आहे. हा सत्कार फक्त व्यक्तीगत मानाचा नव्हे, तर शिक्षण क्षेत्रात कार्यरत अधिकाऱ्यांच्या योगदानाचे आणि प्रेरणादायी कार्याचे सन्मान दर्शवतो. भविष्यात शिक्षण उपनिरीक्षक भारत पालवे साहेब यांचे कार्य समाज आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

पान १ वरुन

## मुंबई मंत्रालयात ...

आश्वासन आणि मुंबईतील बैठकीचे आमंत्रण यामुळे धनगर समाजात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. या लढ्यात धनगर समाज एकजुटीने पुढे असून, २४ सप्टेंबरला जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकलेल्या इशारा मोर्चानंतर आता हा लढा आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## एक पेड...

जिवन सले, नंदकिशोर गरदास इत्यादी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, वृक्ष लागवड हि काळाची गरज असून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करणे अतिशय महत्वाचे आहे, यावेळी त्यांनी जालना जिल्हा लोकनेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनात जालना शहरामध्ये हजारो वृक्ष लागवड केली असून त्यांचे संगोपन हि आपण केल्याचे त्यांनी सांगितले, झाडांना जाळी, टँकर द्वारे पाणी झाडांना टाकून आज लागवड केलेल्या वृक्षा पैकी हजारो रोपट्यांचे वृक्षात रुपांतर झाले असल्याचे सांगितले. यावेळी भाजपा कार्यालय समोर व मुक्तेश्वर लॉन्स येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल परिसरामध्ये प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी बाबा उगले, रवी अग्रवाल, राजू गवई, वर्षा ठाकूर, मंदाताई पवार, वैशाली बनसोडे, दिपाली बिन्नीवाले, वंदना ढगे, शितल तनपुरे, अमोल कारंजेकर, सुभाष सले, अनिल सरकटे, गजानन खरात, बाबुराव भवर, रामलाल जाधव, काकासाहेब घुले, गणेश जल्लेवार, राजाराम जाधव, सतीश केळकर, जगदीश येनगुपटला, शाम उगले, हरिभाऊ गोरे, नागेश अंभोरे, प्रशांत आढावे, बद्री वाघ, डोंगरसिंग साबळे, दौलत भुतेकर, महेश मुळे, सेवकराम नारियलवाले, श्रीराम वाघ, सुदर्शन काळे, निलेश गवळी, कैलास उबाळे, विष्णू डोंगरे, उद्धव ढवळे, कृष्णा गायके, संतोष खंडेलवाल, योगेश शिमगे आदींची उपस्थिती होती.

## विविध प्रशिक्षणाच्या ...

राबवतात, ज्यामुळे नागरिकांना सरकारी योजनांचा थेट आणि जलद लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

गरीब आणि गरजू लोकांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ (उदा. आरोग्य कार्ड, निवासाच्या योजना) मोठ्या प्रमाणावर आणि एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला आहे. देशभरात मेगा मल्टीस्पेशालिटी हेल्थ कॅम्प्स आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. यात मोतीबिंदू शस्त्रक्रिया, महिला आणि बालकांसाठी आरोग्य तपासणी यांसारख्या सेवांवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. विविध सामाजिक आणि धार्मिक संस्था एकत्र येऊन या उपक्रमांमध्ये सहभाग घेतात, ज्यामुळे समाजात सेवाभाव आणि एकोपा वाढतो. स्वच्छता अभियान: 'स्वच्छता ही सेवा' या तत्त्वानुसार स्वच्छता अभियानाचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली जातात. राष्ट्रनिर्माणात तरुणांना आरोग्य, राष्ट्रसेवा आणि व्यसनमुक्ती यांसारख्या सकारात्मक कार्यांशी जोडले जाते. सेवा पंधरवडा हा शासकीय सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधून, लोकांपर्यंत थेट मदत पोहोचवण्याचा आणि सेवाभावाची संस्कृती वाढवण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो. प्रशिक्षणामुळे शिक्षकांना समावेशक शिक्षण आणि भिन्न गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अध्यापन पद्धती कशा बदलायच्या हे कळते. नवीन कौशल्ये आणि ज्ञान मिळाल्यामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते अधिक उत्साहाने आणि प्रेरणेने आपले काम करतात. सेवांतर्गत प्रशिक्षणामुळे शिक्षकांचे ज्ञान आणि कौशल्ये सतत विकसित होतात, ज्यामुळे त्यांच्या व्यावसायिक क्षमतांमध्ये सुधारणा होते आणि त्यांना पदोन्नतीसाठी मदत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी: देशाच्या नवीन शैक्षणिक धोरणांना प्रभावीपणे लागू करण्यासाठी आणि सर्जनशील व चिकित्सक विचारशक्ती विकसित करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण आवश्यक असते. शिक्षक प्रशिक्षण हे शिक्षकांना केवळ शिकवण्यासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांना प्रेरणा, स्फूर्ती आणि स्वावलंबनाची ताकद देऊन त्यांना २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण हे शिक्षकांसाठी अत्यंत महत्वाचे आणि बंधनकारक असते. हे प्रशिक्षण केवळ वेतनवाढीसाठीची अट नसून, शिक्षकांना त्यांच्या व्यावसायिक आयुष्यात अधिक सक्षम बनवण्यासाठी आवश्यक आहे. शासकीय नियमांनुसार, शिक्षकांना १२ वर्षे सेवा पूर्ण झाल्यावर वरिष्ठ वेतन श्रेणी आणि २४ वर्षे सेवा पूर्ण झाल्यावर निवड वेतन श्रेणी मिळवण्यासाठी हे प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य असते. हे प्रशिक्षण पूर्ण केल्यावरच शिक्षकांना त्या श्रेणीचा अधिक पगार आणि इतर आर्थिक लाभ मिळतात. हे प्रशिक्षण म्हणजे शिक्षकांच्या सेवाशर्तींचा एक भाग आहे, जे पूर्ण केल्याशिवाय त्यांना पुढील वेतन श्रेणी मिळू शकत नाही. या प्रशिक्षणात नवीन अध्यापन पद्धती, शैक्षणिक तंत्रज्ञान, मूल्यमापन पद्धती आणि विविध विषयांचे अद्ययावत ज्ञान दिले जाते. यामुळे शिक्षकांचे अध्यापन कौशल्य अधिक प्रभावी होते. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० सारख्या नवीन धोरणांमधील संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन या प्रशिक्षणातून मिळते. ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सतत बदलणाऱ्या युगात, शिक्षकांना त्यांच्या विषयातील नवीन संशोधन आणि शालेय प्रशासनातील बदल यांची माहिती ठेवण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरते. अद्ययावत ज्ञान मिळाल्याने शिक्षकांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते विद्यार्थ्यांना अधिक सक्षमपणे शिकवू शकतात. 'मूल्यांची रुजवणूक' आणि 'जीवनकौशल्यांचा विकास' यांसारख्या विषयांवरील तासिकांमुळे शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतात. हे प्रशिक्षण शिक्षकांना आर्थिक स्थैर्य देण्यासोबतच त्यांना काळानुसार बदलण्यासाठी आणि उत्कृष्ट शिक्षण देण्यासाठी सज्ज करते.असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यावेळी केंद्रप्रमुख विष्णू ढवळे प्रा सहदेव मोरे प्रा पंकज कद्रे प्रा ओमप्रकाश बोरकर विजय राठोड शंकर राठोड विलास काकडे अच्युत राठोड संजय सोनकांबळे रमेश कातारे बालासाहेब फासाटे तानाजी उबाळे रमेश शेटे बाबुराव पवार अनिल वायाळ संदीप सानप सुनील राठोड योगेश रोहिणीकर जगन्नाथ जगताप प्रदीप राठोड रवी राठोड शिवाजी टेकाळे संदीप पवार मिर्झा बेग मधुकर कराळे कैलास शिंदे भागवत भरपुले पांडुरंग बेले सिद्दिकी नासिर मोहन तुरुक माने शाकीर कायमखानी दिगंबर पवार जावेद खान गजानन वायाळ राजेंद्र सानप वर्षा पवार कल्पना शिंदे शिवगंगा लिंगनवाड दिपाली कोल्हे सुनीता कोल्हे अशोक राठोड श्रीमती रोडगे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# जालना महानगरातील मुसळधार पावसामुळे झोपडपट्टीतील नागरिक संकटात

## तय्यब बापु देशमुख यांची जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात १५ सप्टेंबर २०२५ रोजी मुसळधार पावसामुळे शहरातील झोपडपट्टी निवासी नागरिकांचे अनेक घर उद्ध्वस्त झाले. यामुळे गोरगरीब, मोलमजुरी, छोटे व्यापारी यांचे घर व सामग्री मोठ्या प्रमाणावर नुकसान झाली. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापु देशमुख यांनी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्याकडे निवेदन करून तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनातील मुख्य मुद्दे: झोपडपट्टीतील पुनर्वसन आवश्यकता, मुसळधार पावसामुळे झोपडपट्टी निवासी अनेक नागरिकांचे घर उद्ध्वस्त झाले., शासनाकडून पुनर्वसन सहायता देण्यात यावी, अशी मागणी केली.

**महानगरपालिकेची नाले व्यवस्था अपुरी**




शहरातील सांडपाणी जाण्यासाठी नाले व नाल्यांची माहिती महानगरपालिकेकडे नाही. काही वर्षांपूर्वी जुन्या नाल्यांच्या जागी अंडरग्राऊंड पाईप लाईन बसवण्यात आली, पण सांडपाणी प्रेशात जात नाही; पाईप पटकन चौकप होतात. काही झोपडपट्टींमध्ये खदानी असल्याने पाईपातून पाणी उलट घरात शिरते. महानगरातील काही भागांमध्ये २-३ दिवस पाऊस चालू राहिला, तर शहर जलमय झाले.

**दुर्दशेतले महत्त्वाचे इमारती व पूल**

फुलंब्री नाट्यगृहाची स्थिती बिकट; दुरुस्ती करण्याची आवश्यकता., लकडकोट पुल नादुरुस्त; संभाव्य धोकादायक, नवीन पुल करणे गरजेचे., बसस्थानकाजवळील पुल उंच करावा, रामतिर्थ स्मशानभूमीचा पुल दुरुस्त करावा.

**पाणी टाकी आणि आरोग्य:** पाणी टाकीवर ढापे नसल्याने घाण जमते; नागरिकांचे आरोग्य धोक्यात., विसावा शाळा नूतनवहसात पीण्याच्या टाकीत युवकाचा मृत्यू; २० हजार नागरिकांचे आरोग्य धोक्यात.

**महानगरपालिकेच्या प्रशासनातील कमतरता**

नाले, महावीर मंगल कार्यालय, कोंडवाडा, दर्गा माहीत नसणे. शहरातील जुन्या ऐतिहासिक ठिकाणांची माहिती असूनही प्रशासन योग्य व्यवस्था करू शकत नाही.

जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांना बारकाईने लक्ष देऊन जालना महानगरातील नाले, पाईपलाईन्स, पुल आणि इतर इमारतींचा आढावा घेऊन तातडीच्या उपाययोजना करण्याचे आदेश देणे. झोपडपट्टीतील नागरिकांना पुनर्वसन सहायता उपलब्ध करून देणे. शहरातील नागरिकांना पावसाळ्यात सुरक्षित राहण्यासाठी सांडपाणी विसर्जनाची सोय सुनिश्चित करणे. शहरातील महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांचे संरक्षण करणे.

जालना महानगरपालिकेतील व्यवस्थापनातील गंभीर कमतरता आणि पावसाळ्यापूर्वी नाले साफ न केल्यामुळे नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

तय्यब बापु देशमुख यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे निवेदन करून तत्काळ उपाययोजना आणि दीर्घकालीन व्यवस्थापनाची गरज यावर भर दिला आहे, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती टाळता येईल.

# विप्र फाउंडेशन शाखेच्यावतीने दोन दिवसीय दांडिया महोत्सव

**जालना । प्रतिनिधी -** विप्र फाउंडेशन शाखा जालनाच्यावतीने २७ व २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता रुक्मिणी गार्डन येथे दोन दिवसीय दांडिया महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

यासंदर्भात अधिक माहिती देताना विप्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली यांनी सांगितले की, या महोत्सवामध्ये विप्र समाजातील बांधव, भगिनी तसेच नागरिक सहकुटुंब सहभागी होणार आहे. पारंपरिक पोशाख, दांडियाच्या तालावर सजणारे नृत्य, आकर्षक प्रकाशयोजना, रंगीबेरंगी सजावट आणि सांस्कृतिक विविधतेचा संगम या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. आशीर्वचन देण्यासाठी आचार्य सत्यनारायण महाराज व्यास, प.पू. मनोज महाराज गौड, भक्तमाल कथा प्रवक्ता किशोर तिवारी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

आपली संस्कृती, परंपरा आणि ऐक्याचे प्रतीक असलेल्या दांडिया महोत्सवाचा विप्र समाजातील बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन विप्र फाउंडेशनचे अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली, सचिव पंडित विजय व्यास, संस्थापक अध्यक्ष रामनिवास गौड, जिल्हा समन्वयक पवन जोशी, विप्र युवा अध्यक्ष परीक्षित शर्मा, सचिव संतोष खंडेलवाल, रोहित गौड, वरून शर्मा,हितेश जोशी,गौरव बोरा, विप्र महिला अध्यक्ष सौ. जया शर्मा, सचिव सौ. मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष अरुणा पारिक, बहुमंडल अध्यक्ष सौ. प्रियंका दायमा, सचिव सौ. आदिती गौड, कोषाध्यक्ष सौ. सपना सारस्वत, महोत्सवाचे प्रायोजक यजमान बंकटलाल खंडेलवाल, उमेश पंचारिया, श्रीमती ताराबाई उपाध्याय, मनोज जोशी, डुंगरसिंह राजपुरोहीत, अक्षय भारजवाल परिवार, शिवप्रसाद श्रीमाली, नवीनकुमार शर्मा, सूर्यप्रकाश ओझा, संतोष तिवारी, सतीश शर्मा, सिद्धांत शर्मा, अशोक शर्मा, कपिल शर्मा, राजेंद्र शर्मा, अक्षत श्रीमाली, रणवीर मिश्रा, पवन गौड, राजेंद्र सारस्वत, महेश सारस्वत, शैलेश शर्मा,विजय शर्मा, सुशील गौड, संजय सारस्वत, सुनील शर्मा, विशाल शर्मा, जुगलकिशोर श्रोत्रीय, राहुल उपाध्याय, राजेश उपाध्याय, राहुल ओझा, दिलीप गौड, रितेश मिश्रा, राकेश पारिक, अमोल दायमा, संदिप दायमा, नारायण दायमा, भगवान दायमा, सुरेश शर्मा यांनी केले आहे. .

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांची तातडीची बैठक पार पडली

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व हवामान खात्याने पुन्हा दिलेल्या रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांनी शिवसेना , युवासेना पदाधिकारी तसेच प्रमुख कार्यकर्त्यांची तातडीची बैठक बोलावली.

या बैठकीत त्यांनी सर्वांना प्रशासनाच्या संपर्कात राहून जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहण्याचे आदेश दिले. गावागावात फिरून शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी तातडीने संबंधित विभागांपर्यंत पोहोचवाव्यात, स्वतः सह गुराढोरांची देखील काळजी घ्यावी.रानावनात वीजे पासून सावध राहावे झाडाझुडुपां खाली थांबण्याचे टाळावे मदत कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.

**आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांचा संदेश** संकटाच्या काळात जनतेच्या सोबत राहणे हीच खरी शिवसेना आहे. शिवसैनिकांनी प्रत्येक घरापर्यंत पोहोचून मदतकार्याची जबाबदारी पार पाडावी. प्रशासनाला सहकार्य करावे. काही अडचणी उद्भवल्यास माझ्याशी व आपल्या पदाधिकारी कार्यकर्ते व प्रशासनाशी संपर्क साधावा असे देखील आव्हान केले.

यावेळी युवा सेना सचीव अभिमन्यू खोतकर जिल्हाप्रमुख भाऊसाहेब भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, शहर संघटक योगेश रत्नपारखे,दलीत आघाडी जिल्हाप्रमुख भास्करराव मगरे, महिला आघाडीचा प्रमुख सविताताई केवंडे, विजयाताई चौधरी, दुर्गाताई देशमुख अपंग सेनेच्या महिला जिल्हाप्रमुख भुतडाताई ,उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, युवासेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, शैलेश घुमारे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख भगवानराव अंभोरे, ज्येष्ठ शिवसैनिक वसंत राजे जाधव, राहुल गवारे युवासेना तालुका प्रमुख, माजी सभापती पांडुरंग डोंगरे, काशिनाथ जाधव,रवींद्र ढगे सरपंच सिरसवाडी, नगरसेवक गोपी किसन गोगडे, राहुल हिवराळे, नितीन जांगडे, हरेश देवावाले,संजय गायकवाड प्रदीप गायकवाड,लखन कणीसे, संदीप साबळे, संजय डुकरे, मनोज देवरे, किशोर शिंदे, घोडे पाटील, मुसा परसुवाले ,सखाराम लंके, संताजी वाघमारे, अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख शेख जावेद , उपजिल्हाप्रमुख नजिरभाई,अभिषेक काबलीये, कमलेश ख,रे अल्पसंख्यांक शहरप्रमुख जाफरखान,संतोष राष्ट्रीय कृष्णा जाधव बाळासाहेब जाधव वैजनाथ कावले गजानन काळे भागवत काळे गणेश भुतेकर रमेश मस्के सुधाकर वाडेकर बाळासाहेब पाचरणे कृष्णा दादा डोंगरे प्रकाशराव खरात विभाग प्रमुख सचिन देशमुख उदय तनपुरे,शरद ढाकणे , सर्जेराव शेवाळे,गणपत धोतरे देवेंद्र बुदेले, रामकिसन कायदे किरण शिरसाट ज्ञानेश्वर सुपारकर सुनिल कांबळे संतोष सांगळे सोनू साळवे विकी वाघमारेआजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर



जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख विष्णू पाचफुले एडवोकेट भास्कर मगरे यांनी देखील मार्गदर्शन केले.

यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की प्रती वर्षाप्रमाणे यावर्षीही मुंबई येथे आझाद मैदानावर दसरा मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांचे विचार ऐकण्यासाठी आपण मोठ्या संख्येने मुंबई येथे आयोजित विजया दशमीला होणाऱ्या दसरा मेळाव्यात मोठ्या संख्येने सर्वांनी सहभागी व्हावे. तसेच शिवसेना पक्षाची सक्रिय सदस्य नोंदणी सुरू असून या नोंदणी मध्ये सहभाग नोंदवून जास्तीत जास्त सक्रिय सदस्य नोंदणी करून घेण्यात यावी.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.